पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ५६**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २४/३/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. २४६०**

उप आयुक्त, (परिमंडळ क्र. ५) कार्यालयाचे नियंत्रणाखालील भवानी, बिबवेवाडी, कसबा–विश्रामबागवाडा, महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालयांकडील माहे फेब्रुवारी २०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांचे जा.क्र. उआ–५/१३०८० दि. १६/३/२०२० चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २४६१**

मा.आबा बागुल यांचे दि.१७/३/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेचे २०२०-२१ साठी ६२२९ कोटीचे अंदाजपत्रक व स्थायी समितीने ७३९० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक मुख्य सभेत सादर केले. दरवर्षी अंदाजपत्रक मुख्यसभेत मांडण्यात येते परंतु मागील वर्षी अंदाजपत्रकात किती तूट झाली यावर कोणीही चर्चा करत नाही. आपण दरवर्षी खर्च करण्यासाठी कंन्सल्टंटची नेमणूक करतो व त्याप्रमाणे खर्च करतो. परंतु उत्पन्न वाढीसाठी अशा प्रकारे कंन्सल्टंटची किंवा अर्थतज्ञाची नेमणूक करत नाही. हि खेदाची बाब असून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले नाही तर महागरपालिकेचा कर्जाचा बोजा वाढेल ते महानगरपालिकेला परवडण्याजोगे नाही. उत्पन्न वाढीसाठी मोठमोठ्या कंपन्या कन्स्लटंटची नेमणूक करून कंपनीचे उत्पन्न वाढीचे प्रयत्न करून त्यांचे ध्येय साध्य करतात.

त्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेने उत्पन्न वाढीसाठी कन्सल्टन्ट किंवा अर्थतज्ञांची नेमणूक मानधन तत्वावर करून चालना द्यावी. जेणेकरून अंदाजपत्रकातील तरतुदींपर्यंत पोहचणे शक्य होईल. यासाठी लवकरात लवकर पावले उचलावी.

**विषय क्र. २४६२**

मा.आबा बागुल यांचे दि.१७/३/२०२० चे पत्र.

पुणे शहरात दररोज पर्यटन, व्यवसाय, लग्न,शिक्षण अशा वेगवेगळ्या कारणांसाठी लाखो लोक येतात. पुणे शहरात येऊन ते शहरातील विविध सुविधांचा वापर करतात. त्यामुळे शहरातील मूलभूत सुविधांवर त्याचा ताण येतो व पुणे महानगरपालिकेला शहरात वास्तव्यास असणा–या नागरिकांच्या मूलभूत गरजा भागविणे मोठे कठीण होते व त्यामुळे पुणे करांकडून दरवेळेला विविध कर आकारून यासर्व बाबींची भरपाई करावी लागते. पुणेकरांवर अतिरिक्त कर लावणापेक्षा शहरात विविध कारणांसाठी येणा–या व्यक्तींकडून हा कर घेऊन पुणे शहराच्या मूलभूत सुविधा अत्यंत प्रभावीपणे नागरिकांना देता येतील व पुणेकरांची अतिरिक्त कर वाढीतुन सुटका होईल. यासाठी पुणे शहरात येणा–या व ५,४,३ स्टार व अन्य हॉटेल मध्ये वास्तव्य करणा–या टुरिस्ट व्यक्तीसाठी अनुक्रमे ५००,३०० व २०० रूपये प्रतिदिन विविध सुविधांसाठी टुरिझम सर्व्हिस टॅक्स घेण्यात यावा. यातून पुणे महानगरपालिकेला करोडो रूपयांचे उत्पन्न मिळेल व शहराचा विकास करण्यास चालना मिळेल. सध्या जगभरात कोरोना विषाणूने थैमान घातले आहे. मागील सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीमुळे शहरात पूर परिस्थिती निर्माण झाली होती. या सर्व बाबींचा विचार करता आपत्कालीन परिस्थितीत पुणे महानगरपालिकेकडे आपत्कालीन निधी असणे गरजेचे आहे. पुणे शहरात विविध कारणांसाठी येणा–या व्यक्तींकडून टुरिझम सर्व्हिस टॅक्स आकारल्यास आपत्कालीन निधी रिझर्व राहील व पुणे महानगरपालिकेच्या उत्पन्नात देखील भर पडून शहराच्या मूलभूत सुविधा देण्यास महानगरपालिका अधिक सक्षम होईल. यासाठी पुणे शहरात लवकरात लवकर टुरिझम सर्व्हिस टॅक्स लावण्यात यावा. कोणते टॅक्स घ्यायचे याबाबत महाराष्ट्र म्युनिसिपल ऍक्ट मध्ये टॅक्स घेणेबाबत अधिकार असून हा निर्णय लवकरात लवकर घ्यावा व अंदाजपत्रकात आपत्कालीन निधी असा स्वतंत्र हेड काढावा व कोरोना,पूर परिस्थितीशी दोन हात करण्यासाठी टुरिझम टॅक्समधून येणारा निधी आपत्कालीन व शहर विकासासाठी रिर्झव ठेवावा.

**विषय क्र. २४६३**

मा.सौ.मंजुषा नागपुरे यांचे दि.१७/३/२०२० चे पत्र.

पुणे मनपाच्या परिमंडळ ०१,०२,०३,०४,०५ च्या अंतर्गत तज्ञ सल्लागार निवडीच्या प्रक्रीयेत आक्षेपार्ह पद्धतीने अवघ्या १० तज्ञ सल्लागारांची यादी निविदापूर्व प्राप्त करून टेंडर पद्धती राबविण्यात आली. सदर लिमिटेड टेंडर पद्धती ही अपवादात्मक आपद्कालीन परिस्थितीत राबविण्यात येते. सदर टेंडर प्रक्रियेची मनपाच्या सुधारित निविदा कार्यप्रणालीच्या निकषानुसार कोणतीही जाहिरात वर्तमानपत्रात दिलेली नाही. प्रस्तुत ठिकाणी मनपा प्रशासनाने फक्त १० तज्ञ सल्लागारांपुरती लिमिटेड टेंडर प्रक्रिया अवैध व वादग्रस्त अटी टाकून व मनपा प्रचलित आदर्श कायपद्धती व शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्र.क्र. ०८/इमर-२ मंत्रालय मुंबई. दि.२७/०९/२०१८ व अति.महा.आयुक्त (वि)३१ दि.२२/०४/२०१६ अन्वयेचा उल्लंघन करून राबविल्याने इच्छा असूनही अनेक तज्ञ सल्लागारांना टेंडर प्रक्रीयेत भाग घेता आला नाही. आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी तज्ञ सल्लागार निवड प्रक्रीया राबविताना मनपा प्रचलित आदर्श कार्यपद्धती व शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्र.क्र. ०८/इमा-२ मंत्रालय मुंबई दि.२७/०९/२०१८ व अति.महा. आयुक्त(वि)३१ दि.२२/०४/२०१६ अन्वये टेंडर प्रक्रिया राबवावी जेणे करून पुरेशी स्पर्धा होऊन उत्तम व निर्दोष सल्लागार मनपास उपलब्ध होतील.

**विषय क्र. २४६४**

मा.अविनाश बागवे, मा.श्रीमती लता राजगुरु, मा.सौ.सुनिता गलांडे, मा.ॲड्.अविनाश साळवे व मा.सौ.राजश्री काळे यांचे दि.१८/३/२०२० चे पत्र.

सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात माहे मे मध्ये लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता तसेच माहे सप्टेंबर मध्ये विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू होती. यामुळे जवळजवळ २ महिने पुणे महापालिकेची कामे ठप्प होती. माहे डिसेंबर २०१९ व माहे जानेवारी २०२० या दरम्यान स्वच्छ सर्व्हेक्षण असल्याने स्थापत्य विषयक अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचेवर स्वच्छ सर्व्हेक्षणाची जबाबदारी होती. यामुळे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील काही विकासकामे प्रलंबित राहिलेली आहेत.

सदयस्थितीत करोना सारख्या संसर्गजन्य रोगामुळे मागील एक महिन्यापासून विविध खबरदारी म्हणून विविध कामांस निर्बंध लावलेले आहेत, तसेच महापालिकेच्या आवारात नागरिकांना व इतरांना येण्यास मज्जाव केलेला आहे. राज्य शासन व जिल्हाधिकारी यांचेकडून अनेक प्रकारचे आदेश निर्गमित झाले आहेत. करोना पासून बचाव करणेसाठी शहरातून मोठया प्रमाणावर कामगार वर्ग मूळगावी गेलेला आहे. तसेच सदयस्थितीत करोना रूग्णांचा प्रसार पाहता पुढील किती काळापर्यंत निर्बंध असतील हे निश्चित नाही. पुणे महापालिकेची चालू असलेली अनेक कामे ठप्प झाली असून त्याचा परिणाम पुणे शहराच्या विकासावर झालेला आहे. शहरातील मोठी दुकाने, बाजारपेठ व मार्केट देखील बंद आहेत.

एकंदरीत सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात निवडणूक आचारसंहिता, स्वच्छ सर्व्हेक्षणची कामे व करोना सारखा संसर्गजन्य आजार या सर्व बाबींमुळे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात ३ महिने कामकाज सुरळित व वेळेत न झाल्यामुळे या आर्थिक वर्षातील विकासकामांना, ज्या कामांचा निविदा प्रक्रिया किंवा वर्क ऑर्डर ३१ मार्च २०२० पूर्वी झालेल्या आहेत अशा विकासकामांना दि.३१ मे २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. २४६५**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१ मार्च २०२० ते १५ मार्च २०२० ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/१२६७ दि.१८/३/२०२० चे पत्र.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. २४६६**

मा.आरोग्य प्रमुख यांचे नियंत्रणाखालील किटक प्रतिबंधक विभागाकडील अनुदान संदर्भातील कागदपत्रांची व रजिस्टरची सन २०१७-१८ ते १८-१९ अखेर तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/२४०२ दि. १८/३/२०२० ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. २७ सन २०१९-२०२० चा विचारासाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. २४६७**

पुणे महानगरपालिकेच्या उपायुक्त परिमंडळ क्र. १ कार्यालया अंतर्गत कार्यरत असलेल्या येरवडा कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालयाच्या आरोग्य विभागात कामास व वेतनास असलेल्या श्रीमती सिमा राजू साठे, हुद्दा – झाडूवाली यांच्या निलंबन कालावधीस दि. २८/१२/२०१९ रोजी पहिली सहामाही पूर्ण झाली असून मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार सदर बाब निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/१२६३ दि.१७/३/२०२० चे पत्र.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. २४६८**

प्रभाग क्र. ३१ अ मधील सर्वे नं.९ कर्वेनगर येथे योगा हॉल बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अंजनी असोसिएट्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४७,६२,५३१/- पेक्षा १.१८०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.४७,०६,३३३=१३ पर्यंत कामे करून घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.५,७१,५०३=७२ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू. १,००,०००/-पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू.४७,८८०/-पर्यंत अधिक अटीशर्तीनुसार सिमेंट,स्टील या विशेष भाववाढ(स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१२७२, दि.१८/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २४६९**

प्रभाग क्र. २८ ब मध्ये कै.श्रीकांत भडके प्रा.विद्यालय शाळा क्र.१०५ मुलांची संदेशनगर येथे विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निखिल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४७,८८,२५६=४८ पेक्षा ९.९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.४३,०९,४७८=७१ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.५,७४,५९०=७८ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. ४२,४०२/-पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू.७६,७०४/- पर्यंत अधिक अटीशर्तीतील सिमेंट,स्टील यांना विशेष भाववाढ(स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१२६०, दि.१७/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २४७०**

प्रभाग क्र. ८ मध्ये हॉकी स्टेडिअम मध्ये विविध सुधारणा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्रीनिवास एन्टरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३०,९६,१६०/- पेक्षा २२.२५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.२४,०७,२६४=४० पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.३,७१,५३९=२० पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. १४,१३४/-पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू.५,१४५/- पर्यंत अधिक अटीशर्तीनुसार सिमेंट,स्टील यांना विशेष भाववाढ(स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१२६१, दि.१७/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २४७१**

प्रभाग क्र. २ क आदर्श इंदिरानगर येथील अर्धवट असलेले समाज मंदिराचे उर्वरित कामे पूर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सोहम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४८,३५,२१०/- पेक्षा ०.१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.४८,३०,३७४=७९ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.५,८०,२२५=२० पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू.१७,६४१/- पर्यंत अधिक कन्सलटन्सी चार्जेस र.रू. ४८,३५२=१० पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीनुसार सिमेंट,स्टील यांना विशेष भाववाढ(स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१२६२, दि.१७/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २४७२**

प्रभाग क्र.२३ ड मध्ये विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आर्यन कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३५,१३,६५५=२० पेक्षा ५.६०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु ३३,१६,८९०=५१ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी.

र.रुपये ४,२१,६३८=६२ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रूपये ३४,३३७/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार डांबर,स्टील,सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१२६४ दि. १८/०३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २४७३**

घोले रोड क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत येणा-या भागात व विविध ठिकाणी टँकरणे पाणी पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रोहित वॉटर टँकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२९,९९,९१५/- पेक्षा १.०००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२९,६९,९१५=८५० पर्यंत काम करुन घेऊन त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/१२६५ दि.१८/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २४७४**

प्रभाग क्र. २६ महंमदवाडी कौसरबाग येथे एन.आय.बी.एम.रोड,उंड्री रोड, कोंढवा खुर्द परिसरात व प्रभाग क्र. २७ मधील शिवनेरीनगर,मिठानगर,साईबाबानगर व इतर विविध ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एन.वाय.शिवरकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२९,९९,१३०/- पेक्षा ०१.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२९,६९,१३८=७० पर्यंत काम करुन घेऊन त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/१२७० दि.१८/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २४७५**

औंध क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत पाषाण,बाणेर,बालेवाडी भागात टँकरने पाणी पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री.स्वामी समर्थ वॉटर सप्लायर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२९,९९,७८०/- पेक्षा १.०००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२९,६९,७८२=२०० पर्यंत काम करुन घेऊन त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/१२७१ दि.१८/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २४७६**

औंध क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत येणा-या भागात व विविध ठिकाणी टँकरणे पाणी पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रोहित वॉटर टँकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२९,९९,९१५/- पेक्षा १.०००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२९,६९,९१५=८५० पर्यंत काम करुन घेऊन त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पाणीपुरवठा/१२६६ दि.१८/३/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २४७७**

प्रभाग क्र. ८ अ मनपा उद्यानामध्ये पर्यावरणापूरक शिल्प उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.आर्टस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३५,७०,९३७=५० पेक्षा ०.५०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३५,५३,०८२=८१ पर्यंत काम करून घेणेस व त्यानुसराचा जी.एस.टी.र.रू.४,२३,३६९=९४ पर्यंत अदा करणेस अधिक अटी शर्तीतील विशेष भाववाढ सुत्रानुसार दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसुल करणे यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१२६८ दि.१८/०३/२०२० चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. २४७८**

मा.अरविंद शिंदे यांचे दि.१२/३/२०२० चे पत्र.

पुणे शहरातील अनधिकृत व बेकायदेशीर जाहिरात फलकांबाबत गेल्या अनेक वर्षापासून विविध मा.सभासदांनी मुख्य सभेत स्थायी समिति व शहर सुधारणा समितीपुढे वारंवार तक्रारी, प्रश्नोत्तरे केलेली आहेत. मा.उच्च न्यायालयाने पुणे मनपा व अन्य स्थानिक स्वराज संस्थांना जाहिरात नियमावली २००३ चे पालन करून जाहिरात फलक परवानगी व नूतनीकरण देण्याचे स्पष्ट आदेश देवूनही शहरातील ८० टक्के जाहिरात फलक हे उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लघंन

करणारे आहेत. पुणे शहराची प्रतिमा देशभरात होर्डिंग माफियांचे व अनधिकृत जाहिरात फलकांचे शहर अशी होत आहे. दि.१२/३/२०२० रोजीच्या स्थायी समिती कार्यपत्रिका क्र.५४ मध्ये सन २०१३ ते २०२० या कालावधीपासून मा.सभासद अरविंद शिंदे, मा.रफिक शेख, मा.राजश्री काळे, मा.चाँदबी नदाफ, मा.वैशाली मराठे, मा.प्रमोद ओसवाल, मा.योगेश ससाणे, मा.अविनाश बागवे, मा.मुकारी अलगुडे, मा.अभिजीत कदम, मा.सुनिता गलांडे, मा.प्रिया गदादे, मा.छाया मारणे व अन्य सभासदांनी विविध ठरावांद्वारे जाहिरात नियमावली व विकास नियंत्रण नियमावलीचे पालन करणेच्या हेतूने व न्यायालयीन आदेशाचे पालन होणे, बेकायेदशीर जाहिरात फलकावर कारवाई, महसूल प्राप्तीचे कारण दाखवून सामाईक व इमारतीच्या फ्रंट व साईड मार्जिनमध्ये प्रशासकीय आशीर्वादाने झालेले अतिक्रमण हटविणेसाठी स्थायी समितीपुढे ठराव दिलेले आहेत.

जवळपास सात वर्षापासून अभिप्राय देण्यास व ठोस कारवाई करण्यास महानगरपालिका प्रशासन अकार्यक्षम असल्याचे दुर्देवी चित्र निदर्शनास येत आहे. स्मार्ट सिटीकडे झेपावणा-या पुणे शहराचे वेगाने बकालीकरण अनधिकृत जाहिरात फलकांमुळे होत आहे. महापालिका प्रशासन व स्थायी समितीने तातडीने कार्यपत्रिका क्र.५४ मधील सर्व ठरावांचे अवलोकन करून तातडीने धडक कारवाई मोहीम राबवावी. सदर मोहीम मा.आयुक्त स्तरावरून राबविण्यात यावी.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १७/३/२०२० च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. २४७९**

पुणे शहरामध्ये ढग-फुटी सदृश्य पाऊस झाल्याने उदभविलेली पुर परिस्थितीवेळी आपातकालीन परिस्थिती मध्ये मोटार वाहन विभागामार्फत पुरविण्यात आलेली वाहने व यंत्रसामुग्री यांचे वापरापोटी महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियम कलम ६७ (३) (क) मधील तरतुदीनुसार मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यानुसार केलेल्या कामास व त्यापोटी खालील नमुद केल्याप्रमाणे संबधितास देयके आदा करणेस मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मोवावि/१२५८ दि.१७/३/२०२० चे पत्र.

१) मे. अंकिता इंजिनीअर्स, पुणे यांनी पुरविलेल्या विविध मशिनरी पोटी मनपा मोटार वाहन विभागाकडील मान्य निविदा दरानुसार मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यानुसार रक्कम रु. ६७,७५,९२२.५० आदा करणेस---

२) मे. बालाजी अर्थमुव्हर्स ॲण्ड लॅण्ड डेव्हलपर्स, पुणे यांनी पुरविलेल्या विविध वाहने व मशिनरी पोटी मनपा मोटार वाहन विभागाकडील मान्य निविदा दरानुसार मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यानुसार रक्कम रु.२,७१,८३०/- आदा करणेस---

३) मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांनी पुरविलेल्या विविध वाहनांपोटी मनपा मोटार वाहन विभागाकडील मान्य निविदा दरानुसार मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यानुसार रक्कम रु. १२,२६,१६०/- आदा करणेस-

४) मे. राधीका एंटरप्रायजेस, पुणे यांनी पुरविलेल्या विविध मशिनरी पोटी मनपा मोटार वाहन विभागाकडील मान्य निविदा दरानुसार मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यानुसार रक्कम रु. ५३१४०/- आदा करणेस---

५) मे. एस पी कन्स्ट्रक्शन, पुणे यांनी पुरविलेल्या विविध मशिनरी पोटी मनपा मोटार वाहन विभागाकडील मान्य निविदा दरानुसार मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यानुसार रक्कम रु. ५५८९०/-आदा करणेस---

६) ठाणे महानगरपालिके मार्फत मे. आर्यन पंम्प ॲण्ड एन्व्हारो सोल्युशन प्रा. लि. यांनी पुरविलेल्या मशिनरीकरीता मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यानुसार रक्कम रु. ४,९६,५००/- आदा करणेस---

७) सन २०१९-२० मधील अखर्चीत व शिल्लक राहणाऱ्या तरतुदीमधून म्हणेजच खालील अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावरुन आपातकालीन परिस्थितीमध्ये मोटार वाहन विभागामार्फत पुरविण्यात आलेली वाहने व यंत्रसामुग्री यांचे वापरापोटी वर अनु. क्र. १ ते ६ येथे नमुद ठेकेदारांना एकूण रक्कम रु.८८,७९,४४२.५० (अक्षरी रक्कम रु. अठ्ठयाऐंशी लाख एकोणऐंशी हजार चारशे बेचाळीस पैसे पन्नास फक्त) आदा करणेस

सन २०१९-२०२०    XE23A115

२ - गटारे व नाले सुधारणा (जलोत्सारण विभाग) / मोटार वाहन विभाग

- पावसाठी नाले साफसफाईसाठी भाडेतत्वावर टिपर घेणे (व्हे.डेपो)

मान्य रक्कम रु. ४०,००,०००/- पैंकी रु. २०,००,०००/- व

सन २०१९-२०२० XE23A118

२ - गटारे व नाले सुधारणा (जलोत्सारण विभाग) / मोटार वाहन विभाग

- मनपाचे हाय कपॅसिटी सक्शन कम जेटींग वॉटर रिसायकलीग यंत्रणा आऊट सोर्सिंगद्वारे चालविणे मान्य रक्कम रु. २,०५,००,०००/- पैंकी रु. ६८७९४४२.५०

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)